**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार, दिनांक १९ सप्टेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या वर्धा इथं विश्वकर्मा योजनेच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र आणि कर्ज वाटप; विश्वकर्मा योजनेतील यशस्वीगाथा दर्शविण्यासाठी भव्य थीम पॅव्हेलीयनची निर्मिती.**
2. **'स्वच्छता ही सेवा' या राज्यस्तरीय अभियान पंधरवाड्याचा आज मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ.**
3. **बुलढाणा जिल्ह्यात जिगांव प्रकल्पासाठी निधीची भरीव तरतूद केल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं लाडकी बहीण मेळाव्यात प्रतिपादन.**
4. **चीन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत नागपूरच्या मालविका बंसोडची यशस्वी घोडदौड सुरु -उपांत्यपूर्व सामन्यात प्रवेश.**

****

पंतप्रधान वर्धा दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. ते वर्धा इथं विश्वकर्मा योजनेच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र आणि कर्ज वाटप करतील. या योजनेच्या एक वर्षाच्या यशस्वी पूर्ततेसाठी ते पोस्टाच्या तिकिटाचं अनावरणही करणार आहेत. राज्य सरकारच्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचं उद्घाटन करणार आहेत. याअंतर्गत १५ ते ४५ वयोगटातल्या तरुणांना प्रशिक्षण देण्यासाठी, रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यभरातल्या नामांकित महाविद्यालयामध्ये ही केंद्र स्थापन करण्यात येत आहेत. त्यानंतर ते अमरावती इथं पीएम मित्र अर्थात पीएम मेगा इंटेग्रेटेड टेक्स्टाईल रिजन्स अँड ऍपरल पार्कची दूरदृश्य प्रणालीद्वारे पायाभरणी करतील. या एक हजार एकरवर पसरलेल्या पार्कची निर्मिती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्यात येत आहे. केंद्र सरकारने वस्त्रोद्योगासाठी सात पीएम मित्रा पार्कला मान्यता दिली आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनेचंही अनावरण मोदी करणार आहेत.

पीएम विश्वकर्मा प्रदर्शनी

ग्रामीण आणि शहरी भागातील पारंपरिक कारागीर आणि हस्तकलेच्या लोकांना ओळख प्राप्त करून देण्यासाठी तसेच त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी केंद्र सरकारच्या सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्यावतीने गतवर्षी पी.एम. विश्वकर्मा योजना कार्यान्वित करण्यात आली होती. या योजनेचा वर्षपुर्ती सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या वर्धा येथे होत असून यासाठी भव्यदिव्य थीम पॅव्हेलियन उभारण्यात आला आहे. पीएम विश्वकर्मा योजनेतील यशस्वीगाथा दर्शविण्यासाठी थीम पॅव्हेलीयनची निर्मिती करण्यात आली असून त्यामध्ये देशभरातील

१८ राज्यातील कारागिरांच्या कलाकृतींच्या प्रदर्शनाचा समावेश आहे. यात महाराष्ट्रातील टेलर कीर्ति संतोषराव रावेकर देखील सहभागी होणार असून, समारंभानंतर दोन दिवस ही प्रदर्शनी सर्व नागरिकांसाठी खुली राहणार आहे.

१०० दिवस

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील 100 दिवसांत कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याची माहिती केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज पत्रकार परिषदेद्वारे दिली. पंतप्रधानांनी नुकतेच 65 पिकांच्या 109 जातींचे नवीन बियाणे शेतकऱ्यांसाठी उपलब्ध केले असून हे बियाणे हवामानास अनुकूल, कीड प्रतिरोधक आणि उच्च उत्पादन देणारे असल्याची माहिती चौहान यांनी दिली. याशिवाय अनुदानित दरात खत उपलब्धता, डिजिटल ॲग्रीकल्चर मिशन, किसान चौपाल अशा आगामी काळात येणाऱ्या आणि सध्या सुरु असलेल्या शेतकरी विकास योजनांची त्यांनी माहिती दिली.

माहिती आणि प्रसारण मंत्रालय विशेष अभियान 4.0

स्वच्छतेला संस्थात्मक रूप देण्याच्या आणि सरकारमधील प्रलंबितपणा कमी करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दृष्टिकोनातून प्रेरणा घेत, माहिती आणि प्रसारण मंत्रालय आपल्या क्षेत्रीय कार्यालयांसह 2 ऑक्टोबर ते 31 ऑक्टोबर या कालावधीत विशेष अभियान 4.0 मध्ये सहभागी झालं आहे. या अंतर्गत अधिक चांगल्या पद्धतीने जागा व्यवस्थापन, प्रलंबित बाबींचा निपटारा, स्वच्छता संस्थात्मक करण्यासाठीच्या सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब आणि विविध माध्यमातून जागरूकता निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केलं जाणार आहे. दरम्यान देशभरात 'स्वच्छता ही सेवा' अंतर्गत विविध उपक्रमाचं आयोजन करण्यात येत असून यात 'एक पेड मा के नाम' या अभियानाचा देखील सामावेश करण्यात आला आहे. वृक्ष लागवड करण्यासंदर्भात महाराष्ट्र वन विभागाच्या प्रमुख शौमिता बिश्वास यांनी वृक्ष लागवडचं महत्व प्रतिपादित केलं.

***एक वृक्ष माँ के नाम ये बड़ा अच्छा कॉन्सेप्ट है, जो माननीय प्रधानमंत्रीने इसकी शुरुवात की, अगर हम प्रकृति की सेवा हम करते है, निसर्ग की सेवा करते है, पर्यावरण की सेवा करते है, तो मुझे लगता है ये सबसे बड़ी सेवा ईश्वर की सेवा है। हमारे शहरी भाग में इसकी बहोत ज्यादा आवशकता है, जहां पर पर्यावरण का जो इम्प्रूवमेंट की जरुरत है वो यहाँ पर ज्यादा है। ग्रामीण क्षेत्रों में तो हराभरा है, या पेड़ पौधे है या जंगल भी है। लेकिन शहरी भागोंमें लोगो को वक्त नहीं मिलता है, पर्यावरण से जुड़े रहने का। तो ये एक बड़ा अच्छा इवेंट है जिस के द्वारा हम पर्यावरण से, प्रकृति से, जंगल से जुड़ते है।***

स्वच्छता ही सेवा

सफाई मित्रसुरक्षा शिबीर, परिसर स्वच्छता आणि सर्वांचा सहभाग ही त्रिसुत्री आपण सर्वांनी अंगिकारण्याची गरज असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.'स्वच्छता ही सेवा' या राज्यस्तरीय अभियान पंधरवाड्याचा आज मुंबईतील गिरगाव चौपाटीवरून शुभारंभ झाला. त्यावेळी ते बोलत होते. स्वच्छतेत सर्वांची भागिदारी असायला हवी असं सांगत त्यांनी 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होत असल्याचं सांगितलं. पर्यटनस्थळावर शुन्य कचरा कार्यक्रम राबवण्यात येणार असून स्वच्छ भारत अभियानात महाराष्ट्र कुठेही कमी पडणार नाही असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. महात्मा गांधी जयंतीपर्यंत चालणाऱ्या या अभियानात राज्यातल्या नागरी आणि ग्रामीण भागात "स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता" ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. दरम्यान नागपूर महानगरपालिका व्दारे स्वच्छता ही सेवा" या अभियान अंतर्गत आज सकाळी 10.00 वाजता "स्वच्छता संवाद" कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. वनामती सभागृहात, आयोजित कार्यक्रमात "स्वच्छ अभियानात" स्वच्छतेची शपथ देखील घेतली गेली.

माझी लाडकी बहीण/पुतळे लोकार्पण

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेसाठी महायुती शासनाकडून ३३ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बुलडाणा जिल्हयातील महत्वपूर्ण सिंचन प्रकल्प असणाऱ्या जिगांव प्रकल्पा करिता भरीव निधीची तरतूद केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना निश्चितच फायदा होणार आहे, त्यासोबतच महिलांसाठी लखपती दीदी योजना, शेतकऱ्यांसाठी मोफत वीज, शेतकऱ्यांना दिवसाही वीज पुरवठा करण्यात येईल असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी आज बुलढाणा इथं दिलं. मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लाभार्थी सन्मान मेळाव्या साठी ते बुलढाणा इथं आले होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मनोगतातून महायुतीचे सरकार सर्वसामान्य जनतेच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचं आश्वासन दिलं. बुलढाणा शहरात शिवसेना आमदार संजय गायकवाड यांच्या प्रयत्नातून बसविण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराज, अहिल्यादेवी होळकर, यांच्यासह विविध महापुरुषांच्या पुतळ्यांचे अनावरण मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्यानंतर बुलढाणा जिल्हयातील मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत लाभ, उमेद अभियाना अंतर्गत लखपती दीदींचा यावेळी सन्मान करण्यात आला, तसेच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना निधीचं प्रातिनिधिक स्वरूपात वितरण करण्यात आलं.

मालविका बनसोड

चीन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत नागपूरच्या मालविका बंसोडची यशस्वी घोडदौड सुरु आहे. भारतीय बॅडमिंटनपटू मालविका बन्सोड हिने आज गांगझू इथं चायना ओपन

2024 BWF सुपर थाऊसंड (1000) स्पर्धेत महिला एकेरीत क्रिस्टी गिल्मोर या वरिष्ठ मानांकित खेळाडूचा पराभव करून उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला आहे. १ तास ५ मिनिटं चाललेल्या या सामन्यात जागतिक क्रमवारीत ४३ व्या स्थानावर असलेल्या मालविकाने दोन वेळच्या कॉमन वेल्थ विजेत्या स्कॉटलंडच्या गिल्मोरला २१-१७, १९-२१, २१-१६ अशा सेटने पराभूत केलं. सुपर थाऊजंड स्पर्धेत ती पहिल्यांदाच उपांत्यपूर्व सामना खेळणार आहे.

विजय वडेट्टीवार

महायुती सरकारच्या उदासीनतेमुळे महाराष्ट्रात येणारा सौर ऊर्जा प्रकल्प अन्य राज्यात गेला असा आरोप विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. समाज माध्यमावरील आपल्या संदेशात त्यांनी नागपुरातील बुटीबोरी एमआयडीसी इथं येणारा १८ हजार कोटीं रुपये गुंतवणुकीचा प्रकल्प गुजरातला गेल्याचं नमुद केलं. महायुती सरकार महाराष्ट्रात असल्यामुळे जगभरातील कंपन्या आणि उद्योगांना राज्यात उद्योग करणे कठीण झाले आहे, अशी टिका वडेट्टीवार यांनी केली आहे.

सखी वन स्टॉप सेंटर

महिला आणि बाल विकास विभाग अंतर्गत मिशन शक्तीच्या माध्यमातून भंडारा इथल्या नागपूर नाका परिसरात 2020 साली सखी वन स्टॉप सेंटरची स्थापना करण्यात आली होती. या सेंटरमध्ये पाच वर्षात 806 महिला आणि मुलींना निवारा देण्यात आला, तसंच 492 महिलांचे कौटुंबिक समुपदेशन करून 244 महिलांचे संसार सखी वन स्टॉप च्या माध्यमातून सुरळीत करण्यात आले आहेत. संघर्ष ग्रस्त किंवा अन्याय ग्रस्त महिलांना विविध प्रकारच्या मोफत सेवा या केंद्रात दिल्या जातात.

हवामान

येत्या काही तासात अमरावती, वर्धा आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. याशिवाय यवतमाळ, अकोला आणि चंद्रपुर जिल्ह्यांमध्ये देखील अत्यंत हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

*****